Sakal Times - 3 February, 2020

# Cops save woman trying to kill herself

ST CORRESPONDENT
reporters@sakaaltimes.com

**PUNE:** Prompt response from Pune city police beat marshalls saved the life of a woman in Hadapsar on Saturday, who was trying to commit suicide due to some domestic issue.

Around 1 pm, the control room received a call from the victim herself, seeking help. Accordingly Constables Amol Babar and Vilas Rathod, who were on beat marshall duty, were sent to the location.

After getting information about the incident, PSI Rajshri Patil and Police Naik Sambhaji Ramrao Bendre and constable Sachin Ashok Karpe also reached the spot. The woman had consumed poison. The door of her flat was locked from inside.

Senior Police Inspector Ramesh Sathe, in-charge of Hadapsar police station, said, "Without wasting time, they broke open the door and found that the woman had also cut her wrist and was unconscious. She was immediately rushed to a nearby hospital in an autorickshaw. Later, she was shifted to another hospital as her condition was deteriorating. Now she is stable. The doctors told her family that timely help saved her life."



**GOOD DEED:** Senior Police Inspector Ramesh Sathe (2R), in-charge of Hadapsar police station, felicitated the cops for saving the woman's life with their prompt response.

Around 1 pm, the control room received a call from the victim herself, seeking help. Accordingly Constables Amol Babar and Vilas Rathod, who were on beat marshall duty, were sent to the location.

# रागाच्या भरात घरातून निघालेली तरुणी सुखरूप आईच्या ताब्यात

## सिंहगडरोड पोलिस, महिला डॉक्टरांनी दिला आधार

**धायरी : पुढारी वृत्तसेवा**

घरातून रागाने निघून आलेल्या तरुणीला सिंहगडरोड पोलिस तथा महिला डॉक्टरांनी आधार देत सुखरूप तिच्या आईच्या ताब्यात दिले. मिळालेल्या माहितीनुसार शनिवार, १५ फेब्रुवारी रोजी दुपारी एकच्या सुमारास वडगाव बुद्रुक येथील मुंबई-बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावरील उड्डाणपुलावर एक तरुणी बसली होती. तिच्याकडे येथून रिक्षातून जाणाऱ्या डॉ. प्रज्ञा बगोल यांचे लक्ष गेले.

त्यांनी तावडतोब रिक्षा थांबवून तिची चौकशी केली. त्या वेळेस ती तरुणी मोठ्याने रडू लागली. त्यांनी त्या तरुणीला आपल्याबरोबर रिक्षात बसवून पाणी पाजले. त्या तरुणीला आपल्याबरोबर घेऊन पुढे गस्तीवर असलेल्या सिंहगडरोड पोलिस ठाण्याचे हवालदार अनिल बोत्रे व पोलिस नाईक राहुल बांडे यांच्या स्वाधीन केले. पोलिसांनी तत्काळ या तरुणीच्या आईचा मोबाईल नंबर व पत्ता मिळवून संपर्क साधला. दरम्यान, पोलिसांनी तिला विश्वासात घेऊन चौकशी केली असता तिचे नाव कळाले, तिचा पत्ताही तिने सांगितला. ती रागाने घरातून निघून आली होती. चालत-चालत ती काळूबाईला निघाली होती.

या वेळी पोलिसांनी तिला समजावले व घरी परत जाण्यास सांगितले. अर्धातास तिचे समुपदेशन केल्यानंतर तिच्या आईला बोलावून घेत सुखरूप तिच्या आईच्या ताब्यात देण्यात आले.

# 'व्हॅलेंटाइन डे'ऐवजी पोलिसांचा सन्मान

गोकुळनगर, ता. १७ : 'व्हॅलेंटाइन डे' साजरा करण्याऐवजी पुणे पोलिस दलाचा विद्यार्थ्यांकडून सन्मान करण्यात आला. 'केजेईआय' शिक्षण संस्था व ट्रिनिटी ॲकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी या दिवशी पोलिसांचा सन्मान करण्याचा नवा आदर्श समाजासमोर ठेवला, अशी भावना वाहतूक पोलिस निरीक्षक चंद्रकांत निंबाळकर यांनी व्यक्त केली.

अभियांत्रिकी विभागातर्फे विद्यार्थ्यांनी वरिष्ठ पोलिस निरीक्षक विनायक गायकवाड, चंद्रकांत निंबाळकर, गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक महादेव कुंभार, पोलिस उपनिरीक्षक उमेश कदम, मनीषा पाटील, प्रमोद काळे, ज्ञानेश्वर गायकवाड, लक्ष्मण जगताप, समाधान आवडे, प्रल्हाद पवार, रवींद्र सुतार, भाऊसाहेब शिंदे, अर्जुन पवार आदी पोलिसांचा सन्मान करण्यात आला. या वेळी पुलवामा दहशतवादी हल्ल्यातील हुतात्म्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

'केजेईआय'चे संस्थापक कल्याण जाधव, प्राचार्य डॉ. सुहास खोत, डॉ. व्यासराज काखंडकी, प्रा. विवेक शिंदे, एस. के. पाटील, डॉ. डी. सी. बंगाळ, प्रा. पी. यू. चव्हाण आदी उपस्थित होते. अपर्णा हंबरडे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. डी. सी. म्हेत्रे यांनी आभार मानले.



येवलेवाडी : केजेईआय महाविद्यालयात पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

# आत्महत्याचा प्रयत्न करणाऱ्या महिलेचे वाचविले प्राण

पुणे : सासरच्या त्रासाला कंटाळून एका २९ वर्षांच्या महिलेने हाताची नस कापून घेऊन तसेच विषारी औषध पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. मात्र, नागरिकांकडून ही बाब पोलिसांना समजल्यावर त्यांनी घराचा दरवाजा तोडून तिला तातडीने रुग्णालयात दाखल केले. वेळेवर उपचार मिळाल्याने या महिलेचे प्राण वाचू शकले. ही घटना शनिवारी दुपारी एक वाजता हडपसरमध्ये घडली. समयसूचकता दाखवून तातडीने केलेल्या प्रयत्नांमुळे पीडित महिलेच्या नातेवाईकांनी पोलिसांचे आभार मानले.



या महिलेने कौटुंबिक हिंसाचार कायद्याखाली गुन्हा दाखल केला आहे. तसेच, तिच्या घटस्फोटाबाबतचा खटलाही सुरु आहे, असे असतानाही तिला सासूकडून त्रास दिला जात होता. बीट मार्शल अमोल बाबर, विकास राठोड, पोलीस उपनिरीक्षक राजेश्री पाटील, पोलीस शिपाई कर्पे यांनी संबंधीत महिलेला मदत केली.



# हरवलेला मुलगा दोन तासांत पालकांच्या स्वाधीन

लोकमत न्यूज नेटवर्क

**आंबेगाव बुद्रुक :** हरवलेला मुलगा दोन तासांत पालकांच्या स्वाधीन केला. आंबेगाव पठार पोलिसांची कामगिरी. ओळख नसलेल वरघड तालुका, वेल्हा, पानशेतजवळील गावातील दहा वर्षांचा मुलगा सकाळपासून अनवाणी फिरत फिरत तो आंबेगाव पठार, सर्व्हे क्र. १६ मधील साईसिद्धी चौकातील ओम साई नगरमधील गणपती मंदिराजवळ येऊन कट्ट्यावर शांत पडला होता. तो भेदरलेल्या अवस्थेत होता. त्याला मंदिराशेजारी राहात असलेल्या शैला दर्गे यांनी पाहिले, त्याला आपल्या घराकडे येऊन, त्याला खाऊ देऊन त्याला माहिती विचारली. तेव्हा त्यांनी आपले नाव विठ्ठल मरगळे असे सांगितले, त्या वेळी दर्गे यांनी आंबेगाव पठार पोलीस चौकीस कळवल्यावर पोलीस विजय कुंभारकर, नितीन जाधव, नानासो खाडे यांनी तत्काळ वेल्हा पोलिसांशी संपर्क साधून अवघ्या दोन तासांत त्याच्या पालकांच्या स्वाधीन केले.

**सकाळ** – दि १७ फेब्रुवारी, २०२०

# सफाई कामगार कालिंदाचा प्रामाणिकपणा

**हडपसर, ता. १६ :** आजच्या जमान्यातही समाजात प्रामाणिकपणा, माणुसकी टिकून आहे याची प्रचिती देणारे उदाहरण महापालिकेच्या कालिंदा दगडू इचके या सफाई कामगार महिलेच्या कृत्यातून समोर आले आहे. पैशांनी भरलेले पाकीट रस्त्यावर मिळाल्यानंतर प्रामाणिकपणा दाखवत त्यांनी हडपसर पोलिस ठाण्यात दिले. सुदैवाने हे पाकीट हडपसर पोलिस ठाण्यातीलच अनिल सरडे या पोलिस कर्मचाऱ्याचे होते. महिलेच्या प्रामाणिकपणाबद्दल सहायक पोलिस निरीक्षक दिलीप गाडे यांनी त्यांचा सत्कार केला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कालिंदा या गोंधळेनगर येथे रस्त्याची सफाई करत होत्या. त्या वेळी त्यांना रस्त्यावर पडलेले एक पाकीट दिसले. ते उघडून पाहिले असता त्यात ११ हजार रुपये व महत्त्वाची कागदपत्रे त्यांना आढळून आले. मिळालेल्या पैशांचा मोह न ठेवता त्यांनी पाकिटात कोणाचा पत्ता सापडतो का याचा तपास केला, परंतु त्यात कोणताच पत्ता आढळून आला नाही. त्यामुळे त्यांनी हे पाकीट हडपसर पोलिस ठाण्यात जमा केले.

सरडे म्हणाले, की पैशाच्या पुढ्यात नैतिकता हरवणारी माणसं आज पावलापावलांवर आहेत. प्रामाणिकपणा, नैतिकता या गोष्टी फार कमी झाल्या आहेत. असे असताना ११ हजार रुपयांचे सापडलेले पाकीट परत केल्याने सफाई कर्मचाऱ्यांबाबतचा माझा आदर वाढला आहे. कालिंदा इचके म्हणाल्या, की मी गरीब जरी असले तरी मला कष्टकरून पोट भरण्याची सवय आहे. त्यामुळे पैशाचा मोह न ठेवता मूळ मालकाला पाकीट मिळाले. त्याचा मला आनंद आहे.



**हडपसर पोलिस ठाणे :** कालिंदा दगडू इचके यांचा सहायक पोलिस निरीक्षक दिलीप गाडे यांनी सत्कार केला.

**सकाळ** – दि. ५ फेब्रुवारी, २०२०



**केशवनगर :** शिवकुमार नाग यांना मोबाईल परत करताना मुंढवा पोलिस ठाण्याचे कर्मचारी.

# मुंढवा पोलिसांकडून मोबाईल चोरांचा पाठलाग

**मुंढवा, ता. ४ :** केशवनगर येथील जुनी ऑरबीस स्कूलसमोरील रस्त्यावर रात्री दहाच्या सुमारास एका व्यक्तीचा मोबाईल मोटारसायकलवरून आलेल्या तरुणांनी हिसकावून नेला असता, पोलिसांनी पाठलाग करून मोबाईल परत मिळविला.

मुंढवा पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, येथील रहिवासी शिवकुमार जॉन नाग (रा. श्रीकृष्ण हौसिंग सोसायटी, साइगोल्ड रेसिडेंसी, केशवनगर) पायी जात असताना मोटारसायकल स्वारांनी त्यांच्या हातातील मोबाईल हिसकावला. घटनेची माहिती कळताच तेथील गस्तीवर असलेल्या पोलिसांनी त्वरित पाठलाग केला असता मोबाईल फेकून दुचाकीस्वारांनी अंधाराचा फायदा घेऊन पळ काढला. पोलिसांनी तो मोबाईल नाग यांच्याकडे सुपूर्द केला.

पोलिस हवालदार सतीश शिवरकर, पोलिस नाईक उमेश गवळी, महेश पाठक, पोलिस शिपाई विठ्ठल कोकरे तसेच युवराज कोलते आदींनी कारवाईत भाग घेतला.